ePaper

## "सरकारच्या विरोधासाठी आम्ही विदेशी मदत घेतली नाही": नरेंद्र मोदी



| वर्ष - 7 । अंक -78 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- ८० शाळा शिक्षकांविना!
- 9 मंत्री अपात्र ठरणार ?
- सेन्सेक्स ५५० अंकांनी उच्चांकावर
- कार्लोस अल्कारेज नवा चॅम्पियन

www .mahaenews.com । बुधवार, दिनांक 19 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# जलपर्णी आली वाहून;
# प्रशासनाला 'हुरहुर'!

## इंद्रायणी नदी पात्रात तळवडे, रावेत येथे पुन्हा 'खच' : महापालिका प्रशासन हतबल

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जलपर्णीमुक्त इंद्रायणी, पवना हा संकल्प महापालिका प्रशासनाने केला आहे. मात्र, प्रतिवर्षी जलपर्णीचे संकट 'जैसे थे' च्या अवस्थेत आहे. विशेष म्हणजे, जूनअखेर नदीपात्र चकाचक दिसत असताना संततधार पावसामुळे पुन्हा जलपर्णी पाण्याबरोबर वाहून आली आहे. परिणामी, महापालिका प्रशासनाची डोकेदुखी आणखी वाढली आहे.**



ग्राउंड रिपोर्ट

शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीचे पात्र २४ किलोमीटर, इंद्रायणीचे १९ आणि मुळा नदीचे १० किलोमीटर पात्र महापालिका हद्दीतून वाहते आहे. या तीन नद्यांमधील जलपर्णी काढण्यासाठी शहरातील नद्यांची सहा पॅकेजमध्ये विभागणी करून जलपर्णी काढण्याचे कामकाज ठेकेदारांना देण्यात आले. या कामाची मुदत जून- २०२३ रोजी संपली आहे. आता पावसाळा सुरू झाल्यामुळे मावळात संततधार सुरू आहे. परिणामी, नद्यांची पाणीपातळी वाढली आहे. त्यामुळे मावळ आणि परिसरातून वाहून आलेली जलपणी तळवडे, चिखली, रावेत येथील पात्रात साचली आहे. त्यामुळे जलपर्णीचा मुद्दा पुन्हा चर्चेत येण्याची शक्यता आहे.


### पर्यावरण प्रेमींची नाराजी...

जलपर्णी काढण्यासाठी संबंधित ठेकेदारांना सहा महिन्यांची मुदत दिली होती. ती मुदत जून- २०23 मध्ये संपली आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी जलपणी हटवण्यात आली होती.

मात्र, मुदत संपल्यामुळे संबंधित ठेकेदारांनी काम थांबवले. पावसाळा सुरू झाल्यानंतर महापालिका हद्दीलगतच्या भागातील जलपर्णी पावसासोबत वाहून आली आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमी नागरिकांमधून प्रशासनाच्या उदासीनतेबाबत नाराजी व्यक्त होत आहे. दुसरीकडे, संबंधित ठेकेदारांची कामाची मुदत संपल्यामुळे प्रशासनाची 'तांत्रिक कोंडी' झाली आहे.




**जलपर्णीमुक्त नदीपात्र- स्थळ : तळवडे**
**दि. 27 जून 2023**




**जलपर्णी साचलेले नदीपात्र- स्थळ : तळवडे**
**दि. 18 जुलै 2023**

### प्रशासनासमोर नवा पेच...

संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता, लक्षात आले की, जलपर्णी काढण्याबाबत ६ महिन्यांसाठी काम ठेकेदारी पद्धतीने दिले होते. त्यामध्ये संबंधित ठेकेदाराने जलपर्णी काढल्याचे जीपीएस-लोकेशन आणि फोटो प्रशासनासकडे जमा केले आहेत. प्रशासनानेही त्याची शहानिशा केली आहे. कामाची मुदत संपल्यामुळे प्रशासनासमोर पेच निर्माण झाला आहे.

# विद्यार्थ्यांची सुरक्षा ऐरणीवर!

## पोलीस आयुक्त रितेश कुमारांची स्कूल बसचालकांना तंबी

### स्कूल बस नियमावलीचे काटेकोर पालन करावे

| पुणे/ जेजुरी | महाईन्यूज | प्रतिनिधी|

**शालेय विद्यार्थी वाहतूक हा अतिशय संवेदनशील विषय आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून शाळा आणि विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या स्कूल बस यांनी स्कूल बस नियमावलीचे काटेकोर पालन करावे, अशी तंबी पोलीस आयुक्त रितेश कुमार यांनी मंगळवारी दिली. पोलीस आयुक्तालयात आयोजित शालेय विद्यार्थी वाहतूक जिल्हा सुरक्षितता समितीच्या बैठकीत ते बोलत होते.**



या वेळी पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ. अजित शिंदे, पुणे ग्रामीणचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. मितेश घट्टे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर, अतुल आदे आदी उपस्थित होते. यावेळी पोलीस आयुक्त कुमार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या वाहतुकीदरम्यान अपघात किंवा इतर धोक्याच्या घटनांना प्रतिबंध व्हावा यासाठी स्कूल बस नियमावलींचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. स्कूल बसमध्ये मदतनीस, मुलींची वाहतूक होणाऱ्या स्कूल बसमध्ये महिला मदतनीस असणे बंधनकारक आहे. या बसचे वाहनचालक चांगले प्रशिक्षित आणि पूर्वेतिहास चांगला असणारे असावेत. या बाबींची खात्री शालेय परिवहन समितीने करणे आवश्यक आहे.पुणे शहरात माहिती तंत्रज्ञान कंपन्या व आदी ठिकाणी रात्रपाळीत काम करणाऱ्या महिला तसेच एकूणच रात्री प्रवास करणारे ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वच प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रिक्षा, टॅक्सी आदींच्या तपासणीसाठी पोलीस विभाग, वाहतूक शाखा तसेच परिवहन विभागाने संयुक्त विशेष मोहीम हाती घ्यावी, अशा सूचनाही रितेश कुमार यांनी केल्या. जिल्ह्यात स्कूल बस विद्यार्थी वाहतूक समितीचे काम सुलभपणे आणि प्रभावी पद्धतीने होण्यासाठी HTTPS://SCHOOLBUSSAFETYPUNE.ORG हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. जिल्ह्यात ९ हजार ६६३ हजार स्कूल बस असून ५ हजार ७३१ शाळांनी या संकेतस्थळावर नोंदणी केली आहे. उर्वरित सर्व शाळांनी त्यावर नोंदणी करावी यासाठी शिक्षण विभागाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर यांनी केले.

### चालू वर्षात 178 स्कूलबसवर कारवाई

» शालेय विद्यार्थ्यांच्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी परिवहन विभागाने १ जानेवारी ते १० जुलैदरम्यान ७०९ स्कूल बस तसेच ४१७ इतर वाहनांची तपासणी केली. यामध्ये १७८ स्कूल बस व ८४ इतर वाहने दोषी आढळली. त्यातील ३५ वाहने ताब्यात घेण्यात आली. या कारवाईत नियमांच्या उल्लघनाबद्दल २९ लाख ७५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

---

# पालिकेतील ‘ती’ जागा केली शुद्ध

## काँग्रेस, ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक

| पुणे| महाईन्यूज | प्रतिनिधी|

**भाजपाचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ काल समोर आल्यापासून विरोधक अधिक आक्रमक झाले आहेत. राज्यभरात आंदोलन केली जात आहेत. अशातच पुणे महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये किरीट सोमय्या यांना ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी केलेल्या धक्काबुक्कीत ज्या जागी पडले होते ती जागा काँग्रेस पक्षाच्या नेत्या संगीता तिवारी यांनी गंगाजल शिंपडून शुद्ध केली.**



### चित्रा वाघांची चुप्पी

» किरीट सोमय्या ज्या ठिकाणी आले आणि पडले ती जागा आम्ही गंगाजल शिंपडून शुद्ध केली असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच त्या पुढे म्हणाल्या की, भाजपमधील एकही नेता किरीट सोमय्या यांच्या व्हिडीओबाबत अद्याप पर्यंत बोलत नाही. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर आणि भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ या महिलांच्या अन्याय अत्याचाराच्या प्रश्नावर भूमिका मांडतात.

तसेच यावेळी किरीट सोमय्या विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील केली.

शिवाजीनगर येथील कोविड सेंटर घोटाळा प्रकरणी भाजपचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या हे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांच्याकडे मागील वर्षी तक्रार करण्यास आले होते. त्यावेळी ठाकरे गटाचे शहर प्रमुख संजय मोरे यांच्यासह असंख्य शिवसैनिकांनी महापालिकेत येण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करतेवेळी किरीट सोमय्या यांना महापालिकेच्या पायऱ्यांवर धक्काबुक्की झाल्याची घटना घडली होती.

त्यामध्ये किरीट सोमय्या हे पायर्यावर पडले आणि त्यामध्ये ते जखमी देखील झाले होते. त्यावरून राज्यभरात भाजप विरुद्ध ठाकरे गटामध्ये आरोप प्रत्यारोपचे राजकारण पाहण्यास मिळाले. हे आरोप प्रत्यारोपच राजकारण अद्यापही सुरूच आहे.दरम्यान भाजपाचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ काल समोर आला.

---

# क्यूआर कोड स्कॅन करा, एसटीची माहिती मिळवा

| पुणे| महाईन्यूज | |

एसटीने प्रवास करताना गाड्यांचे मार्ग, त्यांच्या वेळा प्रवाशांना माहिती नसतात. त्यामुळे एसटी स्थानकातील चौकशी कक्षासमोर नेहमी गर्दी पाहायला मिळते. यातून मार्ग काढण्यासाठी शिवाजीनगर एसटी स्थानकात क्यूआर कोडचा अभिनव प्रयोग करण्यात आला आहे. आता प्रवाशांना क्यूआर कोड स्कॅन करताच इत्थंभूत माहिती मिळत आहे. आगामी काळात स्वारगेटसह इतर स्थानकांवरही याची अंमलबजावणी केली जाणार आहे. एसटी स्थानकावर गाडी आल्यानंतर ती कोणत्या फलाटावर येणार याची घोषणा होते. त्यावेळी प्रवाशांची धावाधाव सुरू करतात. गर्दीचे नियोजन आणि प्रवाशांना सर्व माहिती त्यांच्या हातात मिळावी, यासाठी शिवाजीनगर एसटी आगाराचे प्रमुख ज्ञानेश्वर रणवरे यांना क्यूआर कोडचा वापर करण्याची कल्पना सुचली. क्यूआर कोडच्या माध्यमातून बसचे मार्ग आणि वेळापत्रक याची माहिती अतिशय सहजपणे देण्याची योजना त्यांनी तयार केली.महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने शिवाजीनगर स्थानकावर या योजनेची अंमलबजावणी सुरू केली आहे.

तिथे आता प्रवाशांना क्यूआर कोडच्या माध्यमातून सर्व माहिती मिळत आहे. स्थानकावर क्यूआर कोड दर्शनी भागात लावण्यात आले आहेत. हे क्यूआर कोड मोबाईलवर स्कॅन केल्यानंतर प्रवाशांनी सर्व माहिती मिळत आहे. विशेष म्हणजे, एसटीचे अधिकारी आणि कर्मचारी यांनीच ही अतिशय सहजसोपी यंत्रणा विकसित केल्याने यासाठी महामंडळाला पैसे खर्च करावे लागलेले नाहीत.

# फडणवीस म्हणतात 'डोन्ट वरी'!

## 'पेटा'च्या भूमिकेनंतर आमदार महेश लांडगे 'ॲक्टिव्ह'

### बैलगाडा शर्यतीबाबत 'पेटा'ची पुनर्विचार याचिका

।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**देशभरातील शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा खेळ बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्याच्या निर्णयाचा फेरविचार करण्याची याचिकेबाबत चिंता करण्याचे कारण नाही. राज्य सरकार आणि केंद्र सरकार सक्षमपणे आपली बाजू मांडणार असून, सर्वोच्च न्यायालयात ही याचिका फेटाळून लावली जाईल, असा विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.**



महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यती, तमिळनाडूतील जल्लिकट्टू आणि कर्नाटकातील कंबाला या रेड्यांच्या शर्यतींना दिलेल्या परवानगीचा फेरविचार करावा, अशी मागणी करणारी याचिका 'द पीपल फॉर दी एथिकल ट्रीटमेंट ऑफ ॲनिमल्स' (पेटा) संस्थेने सर्वोच्च न्यायालयात दाखल केली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार महेश लांडगे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आणि राज्य सरकारने यामध्ये सकारात्मक लक्ष घालण्याची विनंती केली.

देशात बैलगाडा शर्यतींना व पारंपरिक खेळांना परवानगी देणारा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दि. १८ मे २०२३ रोजी दिला होता. त्या निकालामध्ये त्रुटी असल्याने निकालाचा फेरविचार करणे आवश्यक आहे, अशी भूमिका 'पेटा' संस्थेने या याचिकेत मांडली आहे. त्यामुळे शेतकरी, गाडामालक आणि बैलगाडा प्रेमींची चिंता वाढली आहे.

दरम्यान, याबाबत आमदार महेश लांडगे यांनी पावसाळी अधिवेशनाच्या निमित्ताने विधान भवन येथे उपमख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी बैलगाडा शर्यती आणि पुर्नविचार याचिकेबाबत चर्चा करण्यात आली.

### शर्यती भरवताना काळजी घ्यावी...

अखिल भारतीय बैलगाडा संघटनेचे अध्यक्ष संदीप बोदगे म्हणाले की, बैलगाडा शर्यतीबाबत सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली आहे. पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने शर्यती सुरू करण्याबाबत निकाल दिला आहे. परंतु, लोकशाही असल्यामुळे विरोधी पक्षकार पुनर्विचार याचिका दाखल करु शकतात. पुनर्विचार याचिकेचा फारसा परिणाम होणार नाही. पण, राज्यातील शेतकरी, गाडामालक, बैलगाडा प्रेमींनी शासनाच्या नियमांप्रमाणेच शर्यतींचे आयोजन करावे. नियमांचे काटेकोर पालन करावे. ज्यामुळे भविष्यात शर्यतींबाबत कोणतीही अडचण येणार नाही.



"महाराष्ट्रातील बैलगाडा शर्यतींबाबत राज्य सरकारने "रनिंग ॲबिलीटी ऑफ बुल्स" अर्थात बैलांची पळण्याची क्षमता आणि शरीरचना याबाबत महत्त्वपूर्ण अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे. तसेच, कायद्यामध्ये आवश्यक सुधारणा आणि नियमावलीही केली आहे. असे असतानाही काही संस्था अधिकारांचा गैरवापर करुन शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा खेळ संपवण्याचा प्रयत्न करीत आहेत. ही बाब निश्चित संतापजनक असून, याबाबत आम्ही न्यायालयीन लढाई लढण्यासाठी सज्ज आहोत. न्याय शेतकऱ्यांच्या बाजुनेच होईल, असा विश्वास आहे.

**- महेश लांडगे,** शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# मुसळधारची शक्यता; प्रशासनाची सतर्कता

## पेट्रोलिंग करा : आयुक्त शेखर सिंह यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय हवामान विभागाने इतर जिल्ह्यांसह पुणे जिल्ह्यात २१ जुलैपर्यंत मध्यम ते मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले आहे.**



पावसामुळे विविध प्रवाहातून थेट नदीपात्रात येणाऱ्या पाण्यामुळे नदीच्या पाणी पातळीत मोठया प्रमाणावर वाढ झाल्यास आपत्कालीन परिस्थिती उद्भवू शकते, या पार्श्वभूमीवर कोणतीही जिवीत अथवा वित्त हानी होऊ नये यासाठी महापालिकेच्या सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे असे आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी महापालिका प्रशासनाला दिले आहेत. पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यावर पाणी तुंबणार नाही याची दक्षता महापालिका प्रशासनाने घ्यावी, रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत, प्रभागनिहाय बीट निरिक्षक, अभियंते आणि संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी पेट्रोलिंग करून पाहणी करावी, अशी बाब आढळून आल्यास तातडीने उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले आहेत.

शहरातील ज्या भागात पूरसदृश परिस्थिती उद्भवते अशा ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत. नदीकाठी असणाऱ्या शहरातील वस्त्यांमध्ये महानगरपालिकेचे पथक बारकाईने लक्ष ठेवून आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी त्या त्या क्षेत्रातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र पथक नेमण्यात आले असून उपाययोजना देखील केल्या गेल्या आहेत, असे आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितले. पाऊस जास्त प्रमाणात पडल्यास शहरातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होण्याची शक्यता असते. अशावेळी नदीकाठच्या नागरिकांनी आपल्या वस्तू तसेच जनावरांची काळजी घ्यावी, कोणीही नदीपात्रात उतरू नये, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी नागरिकांना दिल्या आहेत.

### अग्निशमन यंत्रणा सज्ज...

संभाव्य परिस्थिती लक्षात घेता अग्निशमनचे कर्मचारी शहरात फिरतीवर असतील. पावसामुळे झाडपडीचे तसेच इतर आपत्कालीन प्रसंग उद्भवल्यास शहरात अग्निशमन यंत्रणा सज्ज असून अग्निशमनची टीम बचाव कार्यासाठी आवश्यक त्या सर्व साधनसामग्रीसह घटनास्थळावर पोहोचण्यासाठी २४ X ७ कार्यान्वित आहे, अशी माहिती अग्निशमन विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी दिली.

"नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने सर्व अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी पूर नियंत्रण कक्ष सुरु आहे. शिवाय महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्ष असून सर्व कक्ष २४ X ७ कार्यान्वित ठेवण्यात आले आहेत. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा.

**- चंद्रकांत इंदलकर,** सह आयुक्त, आपत्ती व्यवस्थापन विभाग.

# चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम




**महाराष्ट्रातील उच्च शिक्षण क्षेत्रात पदवी अभ्यासक्रमाविषयी अभूतपूर्व गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. या शैक्षणिक वर्षांपासून स्वायत्त महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा असेल; तर संलग्नित महाविद्यालयांमध्ये तीन वर्षांचा. यामुळे विद्यार्थी, शिक्षक व पालकांत संभ्रम निर्माण झाला आहे. अशीच परिस्थिती भारतभर आहे.**



राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या (याला यापुढे 'ऑनर्स' म्हटले जाईल) अंमलबजावणीतून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल होणार आहेत. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाविषयीची चर्चा इतिहासात अनेकदा झाली आहे. विशेषत: विविध पदव्यांचा कालावधी वाढवून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात अधिक काळ गुंतवून ठेवायचे आणि या क्षेत्रात वाढत जाणारा विद्यार्थ्यांचा ओघ नियंत्रित करायचा, असे दोन्ही उद्देश यात होते.

१९६४-६५च्या धोरणानुसार आपण १०+२+३ असा नवा आकृतिबंध स्वीकारला. त्यावेळीदेखील पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा असावा, अशी चर्चा केली गेली. त्याकाळी विद्यार्थ्यांचा आर्थिक प्रश्न मोठा होता म्हणून त्या आयोगाने तो प्रस्ताव रद्दबातल ठरवला. यानंतर चार वर्षांच्या अभ्यासक्रमाच्या चर्चेला वेग आला तो २०१३-१४ दरम्यान! हार्वर्ड विद्यापीठाचे पदवीधर असलेले तत्कालीन मानव संसाधन मंत्री कपिल सिब्बल यांनी दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू आणि इतर प्राधिकरणांना दिमतीला घेऊन विद्यार्थी व शिक्षकांना विश्वासात न घेता चार वर्षांचा अभ्यासक्रम लादण्याचा प्रयत्न केला. अमेरिकेतील चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे हे अनुकरण होते. विद्यार्थी व प्राध्यापकांनी दीर्घकाळ संघर्ष करून याला जोरदार विरोध केला. शेवटी, विद्यापीठ अनुदान आयोगाने हस्तक्षेप करून दिल्ली विद्यापीठाला हा अभ्यासक्रम रद्द करण्याविषयी सुचविले. सर्वोच्च न्यायालयानेदेखील यामध्ये हस्तक्षेप करण्यास नकार दिला. विशेष म्हणजे, भारतीय जनता पक्ष व अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांनी ऑनर्स पदवीला विरोध केला होता! पार्श्वभूमीवर भारतात २०१६ मध्ये पुन्हा एकदा चार वर्षांच्या 'ऑनर्स' अभ्यासक्रमाची चर्चा सुरू झाली. सुरुवातीला सुब्रमणियन समितीच्या २०१६च्या अहवालामध्ये बी. एड. हा अभ्यासक्रम समोर ठेवून ऑनर्स पदवीचा नाममात्र उल्लेख करण्यात आला. त्यानंतर २०१९मध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या मसुद्यामध्ये ऑनर्स अभ्यासक्रमाची चर्चा विस्ताराने करण्यात आली. संपूर्ण भारतात सर्वच पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचे असावेत, अशी चर्चा तेव्हाही करण्यात आली नव्हती. परंतु, २०20च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणात ही चर्चा सक्तीचा कार्यक्रम म्हणून अलोकशाही मार्गाने करण्यास सुरुवात झाली. यामुळे गोंधळ वाढत गेला. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सर्वात महत्त्वाचा घटक असलेले विद्यार्थी वा प्राध्यापक किंवा प्राचार्य अथवा कुलगुरूंच्या संघटना किंवा पालकांनी अशी ऑनर्स पदवीची मागणी केली नव्हती. परदेशातील काही विद्यापीठांप्रमाणे भारतामध्येसुद्धा विद्यार्थ्यांची अशी मागणी आहे, असे धोरणकर्त्यांनी गृहीत धरले! भारतातील अत्यल्प विद्यार्थी वर्ग उच्च शिक्षणासाठी अमेरिकेसारख्या देशांमध्ये जातो. हा अत्यल्प घटक समोर ठेवून बहुसंख्य विद्यार्थ्यांना सरकार अकारण वेठीस धरीत आहे, असा आरोप अखिल भारतीय शिक्षण अधिकार मंचाने केला आहे. अर्थात, विकसित देशांमध्ये सर्वच पदवी अभ्यासक्रम हे चार वर्षांचे नाहीत. तरीदेखील, समकक्षतेच्या नावाखाली हा अभ्यासक्रम राबविण्यासाठी सरकार आग्रही आहे. भारतात ज्या कारणांमुळे १९६४-६५ मध्ये ऑनर्स अभ्यासक्रम रद्दबातल ठरविण्यात आला होता, ती कारणे अजूनही अस्तित्वात आहेत. आपल्याकडे पायाभूत सुविधांचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. 'नॅक'चा 'अ' दर्जा प्राप्त केलेल्या शहरी महाविद्यालयांची ग्रंथालये, प्रयोगशाळा आणि क्रीडांगणे सुसज्ज नाहीत. प्राध्यापकांची पदभरती

## संपादकीय »

### आशीर्वाद कसले मागता?

***खरे तर या कर्तृत्ववानांनी स्वत:चा एखादा पक्ष आधी स्थापून आणि चालवून दाखवत स्वत:ची क्षमता सिद्ध करायला हवी. तसे काही करण्याची कुवत यातील एकाकडेही नाही..***

घरच्यांच्या विरोधास डावलून दुसरा पाट लावायचा आणि नव्या खाष्ट बायकोशी कसे जुळवून घ्यायचे हा प्रश्न पडल्यावर आईच्या आठवणीने टिपे गाळायची, असे राष्ट्रवादीतून फुटून निघालेल्या अजित पवार आणि मंडळींचे झालेले दिसते. आपले दैवत, विठ्ठल वगैरे असलेल्या शरद पवारांना सोडून भाजपशी घरोबा केल्यानंतर लागोपाठ अजितदादा आणि मंडळी थोरल्या पवारांचे 'आशीर्वाद' घेण्यासाठी दोन दिवसांत दोन वेळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानात येऊन गेली. पहिल्या दिवशी नव्यानव्या मंत्रीपदाच्या शालूतले फक्त मंत्री होते आणि दुसऱ्या दिवशी मंत्री आणि हाताला मेंदी लावून कोणी हात हातात घेईल अशी वाट पाहणारे अन्य आमदार. म्हणजे जे मंत्री झाले त्यांनाही शरद पवार यांचा आशीर्वाद हवा आणि जे मंत्री होऊ इच्छितात त्यांनाही हवा. त्याच वेळी पवार यांच्यासमवेत असलेलेही हजर होते. त्यांना तर त्यांचा आशीर्वाद हवाच हवा.

**खरं म्हणजे लोकशाही असलेल्या देशामध्ये व्यक्ती स्वातंत्र्य, मुद्रण स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य ह्या बाबी अभिप्रेत आहेतच, यात कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. लोकराज्याची व्याख्याच मुळी लोकांचे लोकांकडून आणि लोकांसाठी असलेले राज्य म्हणजे लोकराज्य अशी केली आहे. याचाच अर्थ असा आहे की, लोकांना जनतेला पर्यायाने, मतदारांना दुर्लक्षून कोणत्याही शासनकर्त्यांनी घेतलेला निर्णय हा योग्य असू शकत नाही.**

## देशाचे राजकारण कुठे चाललेय?

आजकाल सार्वभौम सत्ता हाती आली की, मग राज्यकर्ते लोकमताची पर्वा न करता नैतिकतेची पातळी ओलांडून, निर्णय घेतात आणि मग मतदारांनी ज्या उद्देशाने कौल दिलेला असतो, त्याला पायदळी तुडविल्या जातं व 'सध्या संधी साधून पुढचं पुढे पाहून घेऊ', असें दरकारपणाचे राजकारण राज्यकर्ते प्रमादाने करतात. तसेच जर सतत बहुमत मिळत गेले तर हे पद माझी वतनदारी आहे, असा गैरसमज त्यांचा होतो. पण लक्षात घेतलं पाहिजे की, मतदार हा राज्यकर्त्यांना खूप डोक्यावरही होऊ शकतो. वेळ पडल्यास त्यांना खाली सुध्दा खेचू शकतो. स्व. इंदिराजींच्या बाबतीत घडलेलं उदाहरण राज्यकर्त्यांनी विसरू नये. तसेच नैतिकतेची मर्यादा ओलांडू नये, हे अपेक्षित आहे. चालू आषाढासारख्या पवित्र मराठी मासामध्ये महाराष्ट्रासारख्या मराठमोळ्या प्रदेशात शिवछत्रपतींच्या कर्मभूमीत त्यांच्याच नावाचा आधार घेऊन स्थापन झालेल्या पक्षाला हाताशी धरून, भारतातील



जनतेचा पक्ष असे गोंडस नाव स्वीकारून महाराष्ट्रासारख्या साधू- संतांच्या भूमीत मतदारांना पर्यायाने जनतेला बेवकुफ समजून घाणेरडे राजकारण करणे म्हणजे मोदीजींच्याच भाषेत सांगायचे तर आंघोळ केली, पण ओला झालो नाही, हे सिद्ध करण्यासाठी बाथरुमात रेनकोट घालून शॉवर खालून सहीसलामत बाहेर आल्यासारखे नाही का? म्हणजेच 'पार्टी विथ डिफरन्ट' असा शंखनाद करणारे सुध्दा 'हमाम मे स नंगे' हे कबूल करताना दिसतात. संत मंडळी सांगतात की, ज्याने विठ्ठलमात्रा घ्यावी त्याने पथ्य सांभाळावी. अर्थातच जर मायबाप मतदाराने आम्हाला जो जनादेश दिला, त्याच्याशी इमान राखून राजकारण केले पाहिजे. त्याला अनुसरून व अनुकूल राहून आमचे निर्णय असले पाहिजेत. सध्याच्या काळात महाराष्ट्राच्या राजकारणात जे घडत आहे ते कोणत्याही राष्ट्रप्रेमी मतदाराला अपेक्षित नाही. तसेच घाणेरड्या राजकारण्यालाच नैतिकता समजून वागणारा तो नरइंद्र असो देवइंद्र असो की धरमइंद्र असो मतदार त्याला माफ करणार नाहीत.वाचक मित्रांनो, अटलजींनी एक मत कमी असताना जनतेची चाड बाळगून कुठलाही घोडेबाजार न करता नैतिकतेच्या आधारावर प्रधानमंत्री पदाचा राजीनामा राष्ट्रपतींकडे सादर करून लोकशाही मूल्यांची भूज राखली. त्यांच्या नावावर मते घ्यायची आणि त्यांचे आदर्श मात्र गुंडाळून ठेवायचे, हे जनता कदापिही सहन करणार नाही. मतदारराजाचा प्राप्त झालेला कौल झुगारून जर सत्तांध राजकारणी निर्णय घेत असतील तर नियती त्यांना कधीही माफ करणार नाही.

## ।। अभंगवाणी ।।



कर कटावरी तुळसीच्या माळा ।
ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥

ठेविले चरण दोन्ही विटेवरी ।
ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सोमय्याचा अश्लिल पेनड्राईव्ह !

## » सोमय्यांवर कठोर कारवाईची मागणी; वरिष्ठ पातळीवर चौकशी

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजप नेते किरीट सोमय्या यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे राज्यात मोठी खळबळ माजली आहे. या प्रकरणी सत्ताधारी भाजपला चौफेर टीकेला सामोरे जावे लागत आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाने यासंबंधीचा व्हिडिओ विधान परिषदेच्या पटलावर ठेवत महाराष्ट्रद्रोही सोमय्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.**



त्यावर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कुणालाही पाठीशी न घालता कठोर कारवाई करण्याची ग्वाही दिली.राजकारणात अनेकदा असे प्रसंग येतात की, त्यात माणसाचे संपूर्ण राजकीय आयुष्य व केलेली पुण्याई पणाला लागते. पण समोर आलेल्या प्रकरणात काही तक्रारी असतील, तर सरकार त्याची सखोल चौकशी केली. या प्रकरणी वरिष्ठ पातळीवर चौकशी होईल. कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते पुढे म्हणाले की, प्रस्तुत प्रकरणात महिलेची ओळख जाहीर करता येणार नाही. पोलिसांना केवळ तपासासाठी पीडित महिलेची ओळख दिली जाईल. त्यानंतर पोलिस कायद्याच्या चौकटीत राहून महिलेची पटवून चौकशी करतील. या प्रकरणी कुणाचीही ओळख जाहीर करण्याचा प्रश्नच येत नाही. या प्रकरणी कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही. तत्पूर्वी, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या प्रकरणी किरीट सोमय्या यांच्यावर टीकेची चांगलीच झोड उठवली. काही राजकारणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले व अहिल्याबाई होळकर यांच्या महाराष्ट्रातील संस्कृतीला छेद देण्याचा प्रयत्न करत आहेत. विविध पदांची प्रलोभने दाखवून, ईडी, सीबीआय सारख्या तपास यंत्रणांची भीती दाखवून महिला अधिकाऱ्यांना धमकावून त्यांची पिळवणूक व शोषण करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे ते सोमय्या यांच्यावर हल्लाबोल करताना म्हणाले. यावेळी त्यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्याकडे सोमय्यांशी संबंधित आक्षेपार्ह व्हिडिओचा समावेश असणारा पेनड्राईव्ह सुपूर्द केला. सदर पेनड्राइव्हमध्ये मराठी स्त्रियांविषयी अश्लिल भाषेत संभाषण आहे. त्याचा योग्य तो तपास करा. मराठी महिलांविषयी अशा शब्दांत संभाषण करणारे किरीट सोमय्या खऱ्या अर्थाने महाराष्ट्रद्रोही आहेत, असे दानवे यावेळी सोमय्यांवरील आपली टीका अधिक धारदार करताना म्हणाले. वादग्रस्त पेनड्राइव्हचे अवलोकन करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणीही यावेळी दानवेंनी सभागृहात लावून धरली. भाजपा नेते किरीट सोमय्या यांच्या कथित अश्लिल व्हिडीओप्रकरणी राजकारण तापलं आहे. याप्रकरणी लवकरात लवकर कारवाई करण्याची मागणी केली जातेय. विधान परिषदेत आज याविषयी चर्चा झाली. त्यावेळी याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. तसंच, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनीही याप्रकरणी टिप्पणी केली आहे. देवेंद्र फडणवीसांनी याप्रकरणी चौकशीचे आदेश दिल्यानंतर नीलम गोऱ्हे यांनी सभागृहात निवेदन सादर केले. त्या म्हणाल्या की, "सोमय्याप्रकरणी फडणवीसांनी चौकशी जाहीर केली आहे. याप्रकरणात एक अस्वस्थ करणारा मुद्दा आहे. व्हिडीओ ब्लर करून चॅनेल्सवरून घराघरात हे शॉर्ट्स दाखवले जातात. आपल्या घरात मुलं मुली पाहतात. मी विनंती करीन की तुम्ही व्हिडीओ ब्लर करत असला तरीही सगळं कृत्य परत परत दाखवा, व्हिडीओ दाखवत असताना थोडं बंधन ठेवा.

### पेनड्राईव्ह बघणं फार कठीण परीक्षा

» पोलिसांच्या चौकशीत या वाहिन्यांनी गोपनिय स्वरुपात माहिती द्यावी. जेणेकरून पीडित महिलेपर्यंत पोहोचणं शक्य होईल. त्या पुढे म्हणाल्या की, "तुम्ही पेन ड्राईव्ह मला दिला आहे, तो बघणं म्हणजे फार कठीण परीक्षा आहे माझ्यासाठी. पण मी त्यामध्ये महिला पोलीस अधिकारी, महिला डॉक्टर या मान्यवराना ते बघायला सांगेन. त्या महिलेचे तक्रार आली पाहिजे", असं नीलम गोऱ्हे म्हणाल्या.

---


# अदानींना देताना जनतेचे 3 हजार कोटी बुडवले

## »धारावी पुनर्विकास प्रकल्पाला न्यायालयात आव्हान

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानी समुहाला देण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत सुमारे 20 हजार कोटींच्या निधी खर्चून मध्य मुंबईतील 259 हेक्टरवरील धारावी झोपडपट्टीचे पुनर्वसन केले जाणार आहे.**



मात्र यासाठी जारी केलेल्या निविदा प्रक्रियेलाच विरोध करत मुंबई उच्च न्यायालयात प्रतिस्पर्धी कंपनीकडून याचिका सादर करण्यात आली आहे. सेकलिंक टेक्नॉलॉजी कॉर्पोरेशनने डिसेंबर 2022 मध्ये दाखल केलेल्या या याचिकेत त्यांना दोन आठवड्यांत सुधारणा करण्याची संधी देत हायकोर्टाने याचिकेवरील सुनावणी 7 ऑगस्टपर्यंत तहकूब केली आहे. विशेष म्हणजे राज्य सरकारने अदानीला ही निविदा देण्याचा निर्णय घेण्यापूर्वीच ही याचिका हायकोर्टात दाखल केली गेली होती.

आता तसा अध्यादेश जारी झाल्यामुळे या याचिकेत आवश्यक त्या सुधारणा करण्याकरता हायकोर्टाने कंपनीला ही परवानगी दिली आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती नितीन जामदार आणि न्यायमूर्ती आरीफ डॉक्टर यांच्या पीठासमोर या प्रकरणी मंगळवारी सुनावणी झाली. राज्याच्या गृहनिर्माण विकास विभागाने गुरुवारी जारी केलेल्या एका आदेशाद्वारे अदानी समुहाला या प्रकल्पाशी निगडित हक्क प्रदान करण्यात आले.

या महत्त्वकांक्षी प्रकल्पाच्या पूर्ततेनंतर कंपनीला मध्य मुंबईतील लाखो चौरस फूट निवासी व व्यावसायिक संकुलांची विक्री करून कोट्यवधींचा महसूल मिळवता येईल. या प्रकल्पांतर्गत 2.5 चौरस किलोमीटरपेक्षा जास्त परिसरात राहणाऱ्या 6.5 लाख झोपडपट्टीधारकांचे 7 वर्षांच्या कालावधीत पुनर्वसन करण्यात येणार आहे.अदानी समूह धारावीचे पुनर्वसन, नूतनीकरण, सुविधा व पायाभूत सुविधांचा विकास करणार आहे. हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी अदानी कंपनीला स्पेशल पर्पज व्हेईकल तयार करावे लागणार आहेत. सरकारने गुंतवणुकीची योग्य ती कालमर्यादाही निश्चित केली आहे.

### कंपनीचे गंभीर आरोप

» या प्रकरणी 2018 च्या निविदेत, सेकलिंकने सर्वाधिक 7 हजार 200 कोटी रुपयांची बोली लावली होती. तर अदानी समूहाने त्यावेळी फक्त 4 हजार 300 कोटींची बोली लावली होती. मात्र काही विशिष्ट हेतूनेच दुसऱ्यांदा बोली आयोजित करण्यात आली तेव्हा सेकलिंक यात सहभागी होणार नाही विशेष अशी काळजी घेऊनच नव्या अटी घालण्यात आल्या, असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अदानी रिएलिटीने अलीकडेच धारावी पुनर्विकासासाठी 5 हजार 069 कोटी रुपयांची बोली लावून ही निविदा मिळवली आहे. मात्र राज्य सरकारने वारंवार निविदा रद्द करून हा प्रकल्प अदानीला आंदण म्हणून देताना जनतेच्या 3 हजार कोटींचं नुकसान केल्याचा आरोप कंपनीकडून करण्यात आला आहे.

# मोदी विरुद्ध 'इंडिया'ची लढाई!

## आगामी निवडणुकीत विरोधी पक्षांच्या आघाडीचं नाव इंडिया

। बंगळुरु ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी बंगळुरुतील विरोधी पक्षांच्या बैठकीनंतर संबोधित करताना मोठी घोषणा केली. विरोधी पक्षांची आघाडी आता यापुढे इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इंक्लूझिव अलायन्स नावानं लढणार आहे, असं मल्लिकार्जून खरगे म्हणाले. या अलायन्सची पुढील बैठक मुंबईमध्ये होईल, असं देखील ते म्हणाले.आम्ही पाटणा येथे १६ पक्षांचे नेते जमले होते. आज बंगळुरुत २६ पक्षांचे नेते जमले आहेत, असं मल्लिकार्जून खरगे म्हणाले.**



आगामी लोकसभा निवडणुकीत विरोधी पक्षांच्या आघाडीचं नाव इंडिया असेल. यासंबंधीची ११ सदस्यांची संयोजन समिती मुंबईतील बैठकीत जाहीर करु असं ते म्हणाले. मुंबईतील बैठकीच्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील, असं देखील ते म्हणाले.

देशातील २६ राजकीय पक्षांचे नेते बैठकीला उपस्थित आहेत. ही बैठक लोकशाही आणि संविधानाच्या संरक्षणासाठी महत्त्वाची आहे आपण विविध मुद्यांवर चर्चा केली आहे. आम्ही यापूर्वी यूपीए नावानं कार्यरत होतो. आम्ही यापुढं इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इंक्लूझिव अलायन्स या नावानं लढणार आहोत. याला सर्वांनी मान्यता दिली आहे. ११ सदस्यांची समन्वय समिती स्थापन केली जाणार आहे. आमची पुढील बैठक महाराष्ट्रातील मुंबईत होणार आहेत. समन्वय समितीच्या सदस्यांच्या नावांची घोषणा मुंबईत करणार आहोत. प्रचारमोहीमेसाठी एक समिती स्थापन केली जाणार आहे. याचं काम दिल्लीतून होणार आहे, असं मल्लिकार्जून खरगे म्हणाले. पुढील बैठक मुंबई आणि त्यानंतर दिल्लीत होईल. आजच्या बैठकीला उपस्थित राहिलेल्या सर्वांचं आभार मानतो, असं खरगे म्हणाले. भाजपला देशातील लोकशाही, संविधान संपवायचं आहे, असा आरोप खरगे यांनी केला. भाजप ईडी, सीबीआय या सारख्या संस्थांचा वापर विरोधी पक्षांविरोधात करण्यात येत आहे. देशाला कसं वाचवायचं आणि देशातील लोकांना कसं वाचवायचं हे आव्हान आहे.

### आमची लढाई विचाराविरोधात

“आमची लढाई भाजपाची विचारधारा आणि त्यांच्या विचाराविरोधात आहे. ते देशावर आक्रमण करत आहेत. देशात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. देशातली पूर्ण संपत्ती मोजक्या लोकांच्या हाती चालली आहे. यावर जेव्हा आम्ही चर्चा करत होतो. तेव्हा आम्ही स्वत:शी प्रश्न विचारला की, ही लढाई कुणाविरोधात आहे? तर ही लढाई विरोधक आणि भाजपाविरोधात नाहीये. ही लढाई नरेंद्र मोदी आणि ‘इंडिया’मध्ये आहे. ही लढाई त्यांची विचारधारा आणि‘इंडिया’मध्ये आहे. जो कुणी इंडियाच्या विरोधात उभा राहतो. तेव्हा विजय कुणाचा होतो, हे आपल्याला माहीत आहे. वेगळं सांगायची गरजही नाही,”असं राहुल गांधींनी नमूद केलं.

> देशात दलित, हिंदू, मुस्लीम प्रत्येकाचे जीवन धोक्यात आहे. दिल्ली, बंगाल, मणिपूर असो, सरकारांची खरेदी-विक्री हेच त्यांचे काम आहे. आमच्या आघाडीचे नाव इंडिया आहे. बीजेपी तुम्ही इंडियाला चॅलेंज करणार का? **- ममता बॅनर्जी**

> 9 वर्षांत केंद्राने प्रत्येक क्षेत्र उध्वस्त केले आहे. यांनी विमानतळ, जहाज, आकाश, जमीन, पाताळ सर्व काही विकले आहे. या सरकारवर शेतकरी, व्यापारी प्रत्येक घटक असमाधानी आहे. देशात द्वेष पसरवला जात आहे, त्यापासून देशाला वाचवण्यासाठी आम्ही एकत्र आलो आहोत. **- अरविंद केजरीवाल**

# कुनोतील चित्त्यांची चिंता

## आणखी तीन चित्त्यांना रेडिओ कॉलरचा संसर्ग

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशातील कुनो नॅशनल पार्कमध्ये आणखी तीन चित्त्यांना संसर्ग झाल्याची माहिती समोर आली आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी याला दुजोरा दिला आहे. पवन नावाच्या चित्त्याला दोन दिवसांपूर्वी बेशुद्ध करून त्याच्यावर उपचार करण्यात आले आहेत.**



तर इतर दोन चित्ते जंगलात असून, त्यांना अद्याप पकडलेले नाही.कुनो नॅशनव पार्कचे डीएफओ (विभागीय वन अधिकारी) प्रकाश वर्मा यांनी सांगितले की, पवनच्या मानेवर झालेल्या जखमेमुळे त्याला संसर्ग झाला आहे. दुसरीकडे, कुनो नॅशनल पार्कचे सीसीएफ उत्तम शर्मा यांनी चित्त्यांना संसर्ग झाल्याच्या बातम्या दिशाभूल करणाऱ्या असल्याचे म्हटले आहे. तसे काही नसून तसे असते तर माहिती दिली जाईल, असे ते म्हणाले. मिळालेल्या माहितीनुसार, पवनसह 3 चित्ते रेडिओ कॉलर किंवा परस्पर संघर्षामुळे जखमी झाले आहेत. जखमेत संसर्ग झाल्याचेही म्हटले जात आहे. उशिरा ही माहिती मिळाल्याने तत्काळ उपचार होऊ शकले नाही. त्यामुळे संसर्ग वाढला आहे. मात्र, याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. कुनो व्यवस्थापनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, चित्ता पवन एका महिन्यापेक्षा जास्त काळ मोठ्या बंदोबस्तात होता. पवन शिवपुरीच्या दिशेने गेला होता, त्याला बेशुद्ध करून कुनो येथे आणले होते, तेव्हापासून तो बंदोबस्तात होता. दक्षिण आफ्रिकेतून आणलेल्या सूरज या नर चित्ताचा शुक्रवारी, 7 जुलै रोजी, तर तेजसचा मंगळवारी, 11 जुलै रोजी मृत्यू झाला. एका आठवड्यात दोन चित्त्यांच्या मृत्यूचे कारण म्हणजे त्यांच्या गळ्यात घातलेल्या रेडिओ कॉलरचा संसर्ग, असे म्हटले जात आहे. दक्षिण आफ्रिकेतील चित्ता मेटापॉप्युलेशन तज्ज्ञ व्हिन्सेंट व्हॅन डर मेरवे यांनी अलीकडेच सांगितले की रेडिओ कॉलरमुळे मानेभोवती ओलावा निर्माण होतो आणि जीवाणू तयार होतात.

त्यामुळे चित्त्यांना सेप्टिसिमिया झाला, त्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. मेरवे म्हणाले की, दोन्ही नर चित्त्यांचा मृत्यू सेप्टिसिमियामुळे झाला. सेप्टिसिमिया हा एक गंभीर रक्ताचा संसर्ग आहे. त्यामुळे रक्तात विष तयार होऊ लागते.

### चार महिन्यांत आठ चित्त्यांचा मृत्यू

मध्य प्रदेशच्या कुनो नॅशनल पार्कमध्ये गेल्या चार महिन्यांत 8 चित्त्यांचा मृत्यू झाला आहे. 17 सप्टेंबर 2022 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वाढदिवसानिमित्त कुनो नॅशनल पार्कमध्ये नामिबियातून 8 चित्ते सोडले. यावर्षी 18 फेब्रुवारी रोजी दक्षिण आफ्रिकेतील आणखी 12 चित्ते कुनोमध्ये सोडण्यात आले. म्हणजे एकूण 20 चित्ते आणले होते. यामध्ये आतापर्यंत 8 चित्त्यांना आपला जीव गमवावा लागला आहे.

# संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलैपासून

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या पावसाळी अधिवेशनास २० जुलैपासून सुरुवात होत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने बुधवारी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन केले आहे. अधिवेशन सुरळीतपणे चालावे, यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन विरोधी पक्षांना बैठकीत केले जाणार असल्याचे समजते.**

राज्यसभेचे सभापती जगदीप धनकड यांनी अधिवेशनाच्या तोंडावर सर्वपक्षीय नेत्यांना मंगळवारी भेटीसाठी बोलावले होते. पण दिल्लीत रालोआची तर बंगळुरूमध्ये विरोधी आघाडीची बैठक असल्याने धनकड यांना आपली बैठक पुढे ढकलावी लागली. 20 जुलै ते 11 ऑगस्ट या कालावधीत पार पडणाऱ्या पावसाळी अधिवेशनात 21 नवी विधेयके मांडली जाणार आहेत. याशिवाय सात जुनी विधेयके सादर केली जाणार आहेत. संसदेचे पावसाळी अधिवेशन वादळी राहण्याची शक्यता आहे.


एकीकडे जास्तीत जास्त विधेयके मंजूर करून घेण्याचा सरकारचा प्रयत्न राहील तर दुसरीकडे विविध मुद्द्यांवरून सरकारची कोंडी करण्याची विरोधकांची रणनीती राहील. विरोधी पक्षांकडून जे मुद्दे प्रामुख्याने उपस्थित केले जाऊ शकतात, त्यात मणिपूरमधील हिंसाचार, रेल्वे सुरक्षा, वाढती महागाई व अदानी प्रकरणाचा समावेश आहे. दिल्लीतील सनदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या व बदल्याचे अधिकार उपराज्यपालांकडे राहतील, या मुद्द्यावर राज्यसभेत राडेबाजी होण्याची शक्यता आहे. आम आदमी पक्ष या विषयावर आक्रमक असून त्यांना अलीकडेच काँग्रेसने पाठिंबा दिलेला आहे.

# हॅप्पी बर्थडे प्रियंका चोप्रा



ग्लोबल आयकॉन प्रियंका चोप्रा आज 41 वर्षांची झाली आहे. 18 जुलै 1982 रोजी जमशेदपूरमध्ये जन्मलेली प्रियंका ही एक सामान्य सावळ्या रंगाची मुलगी होती, तिला लहानपणापासूनच वर्णभेद आणि अश्लील टिप्पण्यांचा सामना करावा लागला होता. वयाच्या 13 व्या वर्षी तिला अमेरिकेत शिकण्यासाठी पाठवण्यात आले तेव्हा तिला रंगभेदाचा सामना करावा लागला. अमेरिकन मुलांमुळे त्रासलेली प्रियंका बाथरूममध्ये गुपचूप जेवण करायची. अमेरिकेत 3 वर्षे घालवल्यानंतर तिच्या वृत्तीत बदल झाला तेव्हा वडिलांनी तिला घराबाहेर पडण्यास आणि जीन्स घालण्यास बंदी घातली. पण टॅलेंट आणि पॅशनमुळे यश तिच्यापासून फार काळ दूर राहू शकले नाही. वयाच्या अवघ्या 18 व्या वर्षी प्रियंकाने मिस वर्ल्ड बनून एक आदर्श निर्माण केला, पण चित्रपटांमध्ये स्थान मिळवण्यासाठी तिला दिग्दर्शकाच्या चुकीच्या मागण्या आणि अश्लील कमेंट्सचा सामना करावा लागला. आज त्याच प्रियंका चोप्राची गणना बॉलिवूडच्या श्रीमंत अभिनेत्रींमध्ये केली जाते. प्रियंका 4 वर्षांची असताना तिचे वडील लेहमध्ये तैनात होते. लेहमध्ये प्रियंकाचे कुटुंब खोऱ्यात बांधलेल्या बंकरमध्ये राहत होते. इतर सैन्यातील लोकही तेथे राहत होते. लष्करात सेवा बजावत असताना प्रियंकाचे आई-वडील देशातील विविध शहरांमध्ये तैनात होते, त्यामुळे प्रियंकाचे बालपण दिल्ली, चंदीगड, अंबाला, लडाख, लखनौ, बरेली आणि पुणे येथे गेले.वयाच्या अवघ्या 13 व्या वर्षी प्रियंकाला शिक्षणासाठी अमेरिकेला पाठवण्यात आले. ती तिथे तिच्या मावशीकडे राहत होती. सावळ्या रंगामुळे लहानपणी प्रियंकाला शेरेबाजी करून मुले चिडवायची. तिला अनेक मुले भारतात परत जा म्हणून दबावही टाकायची. प्रियंकाला वैशिष्ट्यांबद्दल आणि त्वचेच्या रंगाबद्दल इतका अविश्वास वाटायचा की ती उत्तर देण्यास टाळाटाळ करायची. कोणी चेष्टा करू नये म्हणून प्रियंका इतर मुलांपासून घाबरून बाथरूममध्ये बसून जेवायची.प्रियंकाने तिच्या अनफिनिश्ड या आत्मचरित्रात तिच्या पहिल्या हार्टब्रेकशी संबंधित एक मजेदार किस्सा शेअर केला आहे. तिने लिहिले की, अमेरिकेत इयत्ता 9वीत शिकत असताना ती 10वीत शिकणाऱ्या बॉबच्या प्रेमात पडली होती. एक दिवस प्रियंकाची मावशी किरण घराबाहेर गेली होती. संधीचा फायदा घेत 13 वर्षीय प्रियंकाने बॉबला घरी बोलावले. प्रियंका-बॉब किस करणारच होते की अचानक काकू परतल्या. प्रियंकाने ताबडतोब बॉबला वॉर्डरोबमध्ये लपवले, पण ती पकडली गेली. घरात तिला बोलणे ऐकावे लागले आणि बॉब तिला सोडून गेला. बॉबने काही दिवसांनंतर प्रियंकाच्या मैत्रिणीला डेट करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे तिचे मन दुखावले. प्रियंका चोप्रा वयाच्या 17 व्या वर्षी अमेरिकेतून भारतात आली तेव्हा तिच्या जीवनशैलीत मोठा बदल झाला. ती मॉडर्न झाली होती, पण तिचे वडील अशोक चोप्रा यांना तिची बदललेली वृत्ती आवडत नव्हती. दरम्यान, वयाच्या अवघ्या 17 व्या वर्षी प्रियंकाने लोकलमध्ये क्वीन सौंदर्य स्पर्धा जिंकली

# दीपिका वॉरियर



प्रभासचा 'प्रोजेक्ट के' हा चित्रपट पुढच्या वर्षी रिलीज होणार आहे. चित्रपटाचा टीझर 20 जुलै रोजी अमेरिकेतील सॅन डिएगो कॉमिक-कॉन इव्हेंटमध्ये प्रदर्शित होणार आहे. भारतात एका दिवसानंतर 21 जुलै रोजी टीझर रिलीज होईल. निर्मात्यांनी चित्रपटातील दीपिका पदुकोणचा फर्स्ट लूक आधीच शेअर केला आहे. तो रिलीज झाल्यापासून सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. फर्स्ट लूकमध्ये दीपिका खूपच सुंदर दिसत आहे. पोस्टरमध्ये ती रस्टीक आणि इंटेन्स लूकमध्ये दिसत आहे. तिचा तपकिरी-राखाडी पोशाख वॉर सूटची आठवण करून देतो आणि तिचे डोळेही इंटेन्स दिसत आहेत. दीपिकाचा नो-मेकअप लूक सोशल मीडियावर चांगलाच पसंत केला जात आहे. अभिनेत्रीचा लूक पाहिल्यानंतर ती दमदार ॲक्शन करताना दिसणार असल्याचे निश्चित झाले आहे. चित्रपटात ती वॉरियरच्या भूमिकेत दिसणार आहे. या सायन्स फिक्शन चित्रपटाच्या स्टार कास्टमध्ये दीपिकासह कमल हसन, अमिताभ बच्चन, प्रभास अशी मोठी नावे आहेत. कमल हसन खलनायकाच्या भूमिकेत असणार आहेत. दिशा पाटणीही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# आलियाची माधुरीसोबत तुलना



आलिया भट्ट सध्या तिच्या आगामी रॉकी और रानी या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. अलीकडेच, अभिनेत्री चित्रपटाच्या प्रमोशनसाठी दिल्लीला पोहोचली, जिथे ती एका मल्टिकलर साडीत दिसली, ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. व्हिडिओमध्ये आलिया खूपच सुंदर दिसत आहे. व्हिडिओमध्ये आलिया बहुरंगी साडीत दिसत आहे. तिने ही साडी ब्लू व्ही शेप नेकलाइन ब्लाउजसोबत कॅरी केली आहे. कमीत कमी मेकअप, बहुरंगी एअरिंग आणि मोकळे केस यामध्ये आलिया खूप क्लासी दिसते. यादरम्यान तिने हसत हसत पापाराझींना पोजही दिली. चाहत्यांना तिचा हा सुंदर लूक आवडला आणि त्यांनी व्हिडिओवर कमेंट्सचा वर्षाव केला.


कमेंट करताना एका यूजरने तिची तुलना बॉलिवूड अभिनेत्री माधुरी दीक्षितशी केली. दुसऱ्यावर कमेंट करताना लिहिले की, 'तू खूप सुंदर आहेस आलिया भट्ट'. तिसऱ्याने लिहिले, 'माझी आवडती अभिनेत्री'. त्याचवेळी दुसऱ्या युजरने लिहिले की, 'बाळाला जन्म दिल्यानंतर ती आणखी सुंदर झाली आहे'. रणवीर सिंग आणि आलिया भट्ट स्टारर चित्रपट 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' 28 जुलै रोजी थिएटरमध्ये दाखल होणार आहे. करण जोहर दिग्दर्शित या चित्रपटात शबाना आझमी, धर्मेंद्र आणि जया बच्चन यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार आहेत. या चित्रपटात रणवीर आणि आलियाची जबरदस्त रोमँटिक केमिस्ट्री पाहायला मिळणार आहे. बॉलिवूडसोबतच आलिया भट्टचा हॉलिवूडमध्येही दबदबा आहे. अभिनेत्री लवकरच गल गडोतच्या हार्ट ऑफ स्टोनमधून हॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. या चित्रपटाचा ट्रेलर काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला होता, ज्याला चाहत्यांनी चांगला प्रतिसाद

# तापसीचा टोमणा

तापसी पन्नू ही स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध असलेल्या बॉलिवूड अभिनेत्रींपैकी एक आहे. अलिकडेच तापसीने सोशल मीडियावर चाहत्यांशी संवाद साधला होता. या संवादादरम्यान तापसीने चाहत्यांच्या प्रश्नांना अनेक मजेशीर, उत्तरे दिली. एका चाहत्याला उत्तर देताना तिने, बॉलिवूडच्या अनेक अभिनेत्रींना टोला लगावला. चर्चेदरम्यान चाहत्याने तापसीला विचारले की, ती लग्न कधी करणार आहे? यावर अभिनेत्रीने उत्तर दिले, 'मी लग्न कधी करणार आहे? मी अजून गरोदर नाही. त्यामुळे लवकर तर नाही. केल्यावर मी सर्वांना सांगेन. हे उत्तर दिल्यानंतर तापसी काही वेळ हसतानाही दिसली. तापसीने लग्नाआधी गर्भवती असलेल्या बॉलिवूड अभिनेत्रींची खिल्ली उडवली असे आता म्हटले जात आहे. चाहत्यांशी संवाद साधताना तापसी असेही म्हणाली की, सध्या ती काम करण्यापेक्षा सुट्टीचा आनंद घेत आहे. अभिनेत्रीने सांगितले की, तिच्या पुढील सहलीसाठी ती थायलंडमधील क्राबी बेटावर जाणार आहे. तापसी गेल्या काही वर्षांपासून बॅडमिंटनपटू-प्रशिक्षक मॅथियास बोईसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. चित्रपटांच्या शूटिंगमधून मोकळी असते, तेव्हा ती बहीण शगुन पन्नू आणि प्रियकरासोबत सुट्टीचा आनंद लुटताना दिसते. काही वर्षांपूर्वी पिंकविलाला दिलेल्या मुलाखतीत तापसीने ती फक्त मुलांसाठीच लग्न करणार असल्याचे सांगितले होते. तापसी म्हणाली होती, 'मला मुले हवी असतील तेव्हाच मी लग्न करेन. लग्नानंतरच मुले हवी आहेत. मला माझा विवाह सोहळा खाजगी आणि लहान ठेवायचा आहे, असे ती म्हणाली होती. तापसीचा आगामी चित्रपट डंकी आहे. त्यात ती शाहरुख खानबरोबर झळकणार आहे. राजकुमार हिरानी या चित्रपटाचे दिग्दर्शन करत आहेत. या वर्षाच्या अखेरीस किंवा पुढील काळात तो रिलीज होऊ शकतो. याशिवाय तिच्याकडे 'वो लडकी है कहाँ', 'फिर आयी हसीन दिलरुबा' आणि 'जन गण मन' सारखे चित्रपट आहेत.

# अनन्या-आदित्य पुन्हा सोबत

अनन्या पांडे आणि आदित्य रॉय कपूर यांच्या नात्याची सध्या जोरात चर्चा सुरू आहे. त्याचवेळी, गेल्या काही दिवसांपासून रुमर्ड कपल स्पेन आणि पोर्तुगालमध्ये एकत्र व्हॅकेशन साजरे करत आहे. सोशल मीडियावर दोघांचे काही नवीन फोटो समोर आले आहेत. या फोटोंमध्ये दोघेही एकमेकांसोबत वेळ घालवताना दिसत आहेत. हा फोटो पोर्तुगीज शहर लिस्बनचा आहे, ज्यामध्ये दोघेही रेस्टॉरंटमध्ये बसलेले दिसत आहेत. यादरम्यान दोघेही ड्रिंक्सचा आनंद लुटताना दिसत आहेत. लोकप्रिय फोटोंमध्ये, अनन्या एका स्वेटरमध्ये दिसत आहे, जो तिने पांढऱ्या टी-शर्टसह स्टाईल केला आहे. अभिनेत्री तिच्यासोबत बॅकपॅकही घेऊन जात आहे.



दुसरीकडे, नाईट मॅनेजर अभिनेता कॅज्युअल नेव्ही ब्लू लिनन शर्टमध्ये दिसत आहे. सोशल मीडियावर फोटो समोर आल्यापासून हे जोडपे पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. मात्र, आतापर्यंत दोघांनीही त्यांच्या नात्याबद्दल काहीही सांगितले नाही. याआधी बुधवारी आदित्य-अनन्याच्या व्हेकेशनचे फोटो व्हायरल झाले होते. यादरम्यान, हे जोडपे बुधवारी पोर्तुगालच्या लिस्बन शहरात एकत्र वेळ घालवताना दिसले. दुसरीकडे, याच्या एक दिवस आधी, कपलने मंगळवारी आर्क्टिक मंकीच्या म्युझिक कॉन्सर्टचे व्हिडिओ देखील शेअर केले. पापाराझी मानव मिंगलानीने बुधवारी त्याच्या इंस्टाग्राम हँडलवर जोडप्याचे फोटो शेअर केले. या फोटोंमध्ये अनन्या आणि आदित्य दोघेही कॅज्युअल आउटफिटमध्ये दिसत होते.गेल्या वर्षी क्रिती सेननच्या दिवाळी पार्टीत एकत्र दिसल्यानंतर आदित्य आणि अनन्याच्या डेटिंगच्या अफवा पसरू लागल्या होत्या.

# फाफ डू प्लेसिस बनला सुपरमॅन

## » फॅफ डू प्लेसिसच्या संघाने 17 धावांनी विजय मिळवला

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**क्रिकेटच्या मैदानावर कधी-कधी अशी काही दृश्ये दिसतात, जी वर्षानुवर्षे लक्षात राहतील. कधी फलंदाज आपल्या वेगळ्या प्रदर्शनाने सर्वांचे लक्ष्य वेधून घेतात, तर काही वेळा गोलंदाज आणि क्षेत्ररक्षकही आपल्या जबरदस्त कामगिरीने लक्ष वेधून घेतात. ताजे प्रकरण अमेरिकेत खेळल्या जात असलेल्या मेजर लीग क्रिकेटचे आहे, ज्यामध्ये ३९ वर्षीय फाफ डू प्लेसिसने असा झेल पकडला, जो पाहून प्रेक्षकांनी टाळ्या वाजवून दाद दिली.**



फॅफने घेतलेल्या अप्रतिम झेलचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. दक्षिण आफ्रिकेचा माजी कर्णधार आणि अनुभवी फलंदाज फाफ डू प्लेसिस अमेरिकेत खेळल्या जाणाऱ्या मेजर लीग क्रिकेटमध्ये दमदार प्रदर्शन करत आहे. या लीगमध्ये तो टेक्सास सुपर किंग्जचा कर्णधार आहे. १७ जुलै रोजी, त्याच्या संघाचा सामना एमआय न्यूयॉर्कशी झाला, ज्यामध्ये फॅफच्या संघाने १७ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात फाफ डू प्लेसिसने घेतलेल्या झेलचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. वास्तविक, टेक्सास सुपर किंग्जने पहिल्या २० षटकात १५४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात मुंबईची सुरुवात अत्यंत खराब झाली. सलामीवीर मोनक पटेल शून्यावर बाद झाला. त्यानंतर शायन जहांगीर आणि स्टीव्हन टेलरने थोडा वेळ झुंज दिली, टेलर १५ धावा करून परतला. त्यानंतर पुरणनेही १९ धावा केल्या. अशा स्थितीत मुंबई इंडियन्स अडचणीत आली होती. आता संपूर्ण जबाबदारी झंझावाती फलंदाज टीम डेव्हिडवर होती.

### डेव्हिडचा झेल ठरला टर्निंग पाइंट

टीम डेव्हिड ११९ चेंडूत २४ धावा करून खेळत होता. फॉर्मात असलेला हा फलंदाज संघाला सामना जिंकून देईल, असे वाटत होते. पण फॅफने अप्रतिम झेल घेत टीम डेव्हिडला माघारी पाठवले.

टीम डेव्हिडने २० व्या षटकाच्या डॅनियल सॅम्सच्या पहिल्याच चेंडूवर जोरात फटका मारला, चेंडू उंच हवेत गेला, त्यावेळी ३९ वर्षीय फॅफने वेगाने धावत जाऊन अप्रतिम झेल घेतला. टीम डेव्हिड बाद होताच एमआय संघाने १७ धावांनी सामना गमावला. सामन्याबद्दल बोलायचे झाले, तर लीगचा सातवा सामना टेक्सास सुपर किंग्ज आणि एमआय न्यूयॉर्क यांच्यात झाला, ज्यामध्ये टेक्सास सुपर किंग्ज संघाने १७ धावांनी विजय मिळवला.

विजयाचा हिरो ठरला डेव्हॉन कॉनवे, ज्याने ७४ धावांची खेळी केली. प्रथम फलंदाजी करताना टेक्सास संघाने २० षटकात ७ गडी गमावून १५४ धावा केल्या होत्या, प्रत्युत्तरात एमआय संघ २० षटकात ८ गडी गमावून १३७ धावांवर आटोपला.

---

# माझा कोणी मित्र नाही

## » संघात स्थान न मिळाल्याने मी नाराज

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारतीय संघातून वगळल्यानंतर पृथ्वी शॉने व्यक्त केल्या भावना भारतीय क्रिकेट संघाचा युवा फलंदाज पृथ्वी शॉ सध्या त्याच्या कारकिर्दीतील खराब फॉर्ममधून जात आहे. लहान वयातच आपल्या कर्णधारपदाखाली भारताला अंडर-१९ विश्वचषक जिंकून देणारा शॉ आजकाल भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी खूप संघर्ष करताना दिसत आहे.**

### पृथ्वी शॉची कारकीर्द

२३ वर्षीय पृथ्वी शॉने भारतासाठी आतापर्यंत पाच कसोटी, ६ एकदिवसीय आणि एक टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला आहे. शॉच्या कसोटीत ३३९ धावा, एकदिवसीय सामन्यात १८९ धावा आणि टी-२० सामन्यात शून्य धावा आहेत. शॉ त्याच्या पहिल्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात शून्यावर बाद झाला होता.

२३ वर्षीय खेळाडू नुकतेच दुलीप ट्रॉफी २०२३ च्या अंतिम फेरीत सहभागी झाले होते, जिथे त्याने पश्चिम विभागासाठी पहिल्या डावात अर्धशतक झळकावले होते, परंतु दुसऱ्या डावात तो कामगिरी करू शकला नाही. त्यामुळे प्रियांक पांचाळ यांच्या नेतृत्वाखालील संघाला दक्षिण विभागाकडून पराभव स्वीकारावा लागला. त्यामुळे आता भारतीय क्रिकेट संघाबाहेर असल्याबद्दल पृथ्वी शॉने मोठे वक्तव्य केले आहे. शॉ म्हणतो की, वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी त्याची निवड का करण्यात आली नाही याची आपल्याला कल्पना नाही आणि संघ जाहीर झाला तेव्हा तो खूप दुःखी होता. क्रिकबझला दिलेल्या मुलाखतीत पृथ्वी शॉ म्हणाला, “जेव्हा मला भारतीय संघातून वगळण्यात आले. तेव्हा मला त्याचे कोणतेही कारण समजले नाही. फिटनेस असू शकतो असे कोणी म्हणत होते, पण मी एनसीएमधील सर्व फिटनेस टेस्ट पास केल्या होत्या. मी धावा केल्या आणि टी-२० संघात स्थान मिळवले, पण वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर संघात स्थान न मिळाल्याने मी खूप नाराज होतो. मी याबद्दल कोणाशीही भांडू शकत नाही, मी काहीही करू शकत नाही, तुम्ही फक्त पुढे जा लोक माझ्याबद्दल खूप बोलतात, पण जे मला ओळखतात त्यांना मी कसा आहे हे समजते. मला मित्र नाहीत, पण मला मैत्री करायला आवडत नाही. नव्या पिढीसोबत हेच घडत आहे, त्यांना आपले विचार इतर कोणाशीही सांगता येत नाहीत. मला हे करताना भीती वाटते, सोशल मीडियावर कधी येईल माहीत नाही. म्हणून, मी फक्त काही गोष्टी शेअर करतो.



---

# धोनीला बाइक आणि कारची आवड

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

महेंद्रसिंह धोनीच्या गॅरेजचा एक व्हिडिओ समोर आला आहे. यामध्ये त्याच्याकडील बाईक आणि कारचे कलेक्शन पाहायला मिळते. माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद यांनी हे ट्विट केले आहे. वास्तविक व्यंकटेश प्रसाद आणि सुनील जोशी सध्या रांचीमध्ये आहेत. त्यांनी लिहिले, 'मी एका व्यक्तीमध्ये प्रचंड पॅशन पाहिले आहे. काय कलेक्शन आणि काय माणूस... धोनी. त्याच्या रांचीच्या घरी त्याच्या बाईक आणि कारच्या कलेक्शनची ही झलक. हा माणूस आणि त्याची आवड पाहून मी भारावून गेलो आहे.' व्हिडिओमध्ये व्यंकटेशला रांचीला आल्यानंतर कसे वाटते असे विचारले आहे, ज्यावर तो म्हणतो- अप्रतिम. तू इथे पहिल्यांदा आला आहेस का, असे विचारल्यावर मी चौथ्यांदा रांचीला आलो आहे, असे त्याने सांगितले. व्यंकटेश म्हणाला की धोनी खरोखरच पॅशनेट आहे. अशी आवड असल्याशिवाय तुमच्याकडे इतक्या बाइक्स असू शकत नाहीत.धोनीने त्याच्या रांचीतील फार्महाऊसमध्ये दुचाकींसाठी दोन मजली गॅरेज बांधले आहे. धोनीकडे हार्ले डेव्हिडसन फॅट बॉय, दुकाटी 1098, कॉन्फेडरेट हेलकॅट, कावासाकी निंजा बीएसए गोल्डस्टार आणि हायाबूसासारख्या बाइक्स आहेत.

या बाईकसोबत धोनी रांचीमध्ये अनेकदा स्पॉट झाला आहे.धोनीकडे जगभरातील आलिशान गाड्या आहेत. त्याच्या कार कलेक्शनबद्दल बोलताना, मर्सिडीज बेंझ जीएलई, व्हिंटेज रोल्स रॉईस सिल्व्हर व्राथ मोड्यूस फोर्ड मुस्तंग 429 फास्टबॅक, जीप ग्रँड चेरोकी, हमर, ऑडी, लँड रोव्हर फ्रीलँडर 2, फेरारी 599, मेकॉर्पिस 599 आणि मेकॉर्ड्रेन हिंदुस्थान मोटर्सचे राजदूत यांचा समावेश आहे.